श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-७, अंक-९ | सप्टेंबर-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## डेरवण इंग्रजी शाळेत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दि. १५ ऑगस्ट २०१९ रोजी ७३ वा स्वातंत्र्यदिन समारंभ उत्साहवर्धक वातावरणात साजरा झाला. या कार्यक्रमाला मा. श्री. परमानंद देसाई, कॉस्ट अँड वर्क्स अकाऊंटन्ट, मुंबई हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले.

संस्थेच्या क्रीडासंकुलात ध्वजारोहणाचा सोहळा संपन्न झाल्यावर झालेल्या सभेत शाळेतील इयत्ता नर्सरी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते इंग्रजी, संस्कृत, स्पॅनिश, जर्मन भाषांतून सादर करून उपस्थितांना प्रभावित केले.





*प्रमुख पाहुणे मा. श्री. परमानंद देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण*

प्रमुख पाहुणे श्री. परमानंद देसाई यांनी आपल्या भाषणात प्रथम सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या व हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी व टिकवण्यासाठी जे सैनिक सतत दक्ष असतात अशा सर्व सैनिकांचे आभार व्यक्त केले. आपणही हे मिळालेले स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.

त्यांनी आपल्या भाषणात असे सांगितले की, स्वातंत्र्य मिळूनही अजून संघर्ष संपलेला नाही. त्यासाठी आपण स्वावलंबी आणि अग्रेसर झाले पाहिजे. भाषणात विद्यार्थ्यांना संबोधित करताना ते म्हणाले, 'भविष्यात जे क्षेत्र निवडू त्यात नि:स्वार्थीपणे, जबाबदारीने व कर्तव्यनिष्ठेने काम केले पाहिजे. चांगले शिक्षण घेतले पाहिजे कारण जे ज्ञान शिक्षणातून मिळवू तेच कायमस्वरूपी आपणास उपयोगी पडते.'

श्री.परमानंद देसाई यांनी संस्थेच्या विविधांगी समाजोपयोगी कार्याचा गौरव करताना असे उद्गार काढले की येथील विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात मागे पडणार नाही. कारण येथे आयुष्यात उपयोगी पडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची पूर्ण तयारी करून घेतली जाते. त्यांनी दोन महान व्यक्ती - वर्गीस कुरिअन आणि डॉ. स्वामीनाथन यांचा दाखला दिला. या दोन महान व्यक्तींमुळे भारतात दुग्धक्रांती व हरितक्रांती घडून आली, म्हणूनच आज भारत पूर्ण जगामध्ये दूध उत्पादन व शेती उत्पादन यामध्ये स्वयंपूर्ण व अग्रेसर आहे. तरुण मुलांनीही शेती क्षेत्रामध्ये संशोधनाकडे वळावे असे ते म्हणाले.



अवकाश संशोधन क्षेत्रामध्ये सुद्धा भारताने अभूतपूर्व प्रगती करत 'चांद्रयान २' पाठवून पूर्ण जगतात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे असे सांगत, भारताला सुवर्णकाळात न्यायचे असेल तर जात, धर्म विसरून स्वच्छता, स्वावलंबन, देवी सरस्वतीचे ध्यान करून जीवनोपयोगी ज्ञान नि:स्वार्थीपणे मिळविले पाहिजे; तसेच संशोधन, वैद्यकीय, संरक्षण क्षेत्र अशा वेगवेगळ्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी जाऊन त्याचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी करावा व समाज सुदृढ बनवावा असा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना दिला.



*प्रमुख पाहुणे मा. श्री. परमानंद देसाई आपले विचार व्यक्त करताना*

प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी शारीरिक नैपुण्याचे सादरीकरण केले. शाळेच्या राष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या मल्लखांबपटूंनी चित्तथरारक मल्लखांब प्रात्यक्षिके व योगपटूंनी कौशल्यपूर्ण योगनृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली. शाळेच्या राज्यस्तरीय तिरंदाज खेळाडूंनी आपल्या अचूक लक्ष्यभेद करणाऱ्या प्रात्यक्षिकाने सर्वच उपस्थितांची वाहवा मिळवली.





या कार्यक्रमाला संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी मा. श्री. विकासराव वालावलकर, वैद्यकीय संचालिका डॉ.सुवर्णा पाटील, वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. डोंबले, संस्थेतील डॉक्टर्स, सर्व विभागातील शिक्षक, कर्मचारी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिपळूण येथील पूरग्रस्तांसाठी डेरवण रुग्णालयातर्फे पेठमाप परीटआळीत मोफत शिबिर

अतिवृष्टीमुळे चिपळूण शहरात पुराचे पाणी भरून जनजीवन विस्कळीत झाले होते. साथींच्या रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून चिपळूणच्या पेठमापेत डेरवण रुग्णालयामार्फत पूरग्रस्तांसाठी आरोग्य शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी सावित्री होमकळस (माजी नगराध्यक्ष) व डॉ. मधू जोशी, मुख्याधिकारी डॉ वैभव विधाते उपस्थित होते. या शिबिरात वालावलकर रुग्णालयाच्या टीमद्वारे आरोग्य तपासणी करण्यात आली. त्याच प्रमाणे चिपळूण ओतारी गल्ली येथेही पूरग्रस्तांसाठी वालावलकर रुग्णालयातर्फे शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ शेकडो रुग्णांनी घेतला.



## मंगळागौर कार्यक्रम



नवविवाहित स्त्रियांची आरोग्य तपासणी व्हावी व योग्य वेळी त्यांना जीवन सत्त्वे (बी कॉप्लेक्स) इत्यादीचे वाटप व्हावे यासाठी वालावलकर रुग्णालय मंगळागौरीचे कार्यक्रम दर महिना आयोजित करते. ऑगस्टमध्ये 'व्याडेश्वर मंदिर सखी ग्रुप'च्या श्रीमती ज्योती परचुरे व त्यांच्या २० मैत्रिणी ह्यांच्या ग्रुपने रुग्णालयात येऊन मंगळागौरीच्या निमित्ताने एकत्र आलेल्या दुर्गम भागातील नवविवाहितांसाठी मंगळागौरीचे खेळ सादर केले.

## लहान मुलांच्या किडनी तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा वालावलकर रुग्णालयात उपलब्ध

ऑगस्ट २०१९ मध्ये डॉ. प्रीती इनामदार व डॉ. वर्षा फडके ह्यांनी रुग्णालयात बाल रुग्णांची तपासणी केली आणि मूत्रविकार, किडनीतील जन्मजात दोष इत्यादींवर उपचार केले. किडनी तज्ज्ञ दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी वालावलकर रुग्णालयात भेट देतात.



## ज्युनिअर राज्य ॲथलेटिक्स स्पर्धा संपन्न

'एसव्हीजेसिटी' क्रीडासंकुलात ३५ वी ज्युनिअर राज्य ॲथलेटिक्स स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धांमध्ये दि. १७ व १८ ऑगस्ट रोजी १४, १६ वर्षाखालील वयोगटाच्या ११८० खेळाडूंनी सहभाग घेतला. तसेच दि. १९ व २० ऑगस्ट रोजी १८ वर्षाखालील वयोगटाच्या स्पर्धा संपन्न झाल्या. त्यामध्ये ६४० स्पर्धकांचा सहभाग होता. या स्पर्धेला लातूर, औरंगाबाद, बीड, नागपूर, अकोला, मुंबई, सांगली, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, पुणे, अहमदनगर अशा महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील एकूण १८२० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.





चार दिवस सुरू असलेल्या या स्पर्धेत धावणे, उंच उडी, लांब उडी, गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, हातोडा फेक अशा विविध प्रकारांचा समावेश होता. या स्पर्धेला 'महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन' चे सचिव सतीश उत्छील तसेच 'रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन'चे सचिव संदीप तावडे, तांत्रिक सदस्य, अन्य पदाधिकारी, पंच व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पूरपरिस्थिती बघता पावसाच्या वातावरणातदेखील डेरवण क्रीडासंकुलात मैदानावर पावसाचे पाणी साठत नाही आणि त्यामुळेच स्पर्धा निर्विघ्न पार पडल्या याबद्दल सर्वांनी समाधान व्यक्त केले. क्रीडासंकुलात आयोजित राज्य स्पर्धेला अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा म्हणजेच फोटो फिनिशचा वापर करण्यात आला व अचूक व तत्काळ निर्णय देण्यासाठी मदत मिळाली. तसेच खेळाडूंच्या वयाची पडताळणी करण्यासाठी वालावलकर रुग्णालयातील डिजिटल एक्स-रे मशिनचा वापर करण्यात आला त्यामुळे एकाच संकुलात असलेल्या सर्व सुविधांमुळे स्पर्धा आयोजकांनी समाधान व्यक्त केले. कोल्हापूर जिल्ह्याच्या आदिती बुगड हिने थाळीफेक या क्रीडा प्रकारात ४३.३८ मीटर थाळीफेक करून नवीन राज्यस्तरीय विक्रम केला.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून सप्टेंबर २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ८ सप्टेंबर | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन) | भाजलेले व्रण, डाग - शस्त्रक्रिया व उपचार |
| १३, १४ सप्टेंबर | डॉ. सतेज सबनीस, युरॉलॉजिस्ट, मुंबई | मुतखड्यावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया |
| १४ सप्टेंबर | श्रवण यंत्र व वाचा उच्चार तज्ज्ञ | श्रवण यंत्र व वाचा उपचार |
| २१ सप्टेंबर | डॉ. आनंद जोशी, (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट), मुंबई | पचनसंस्थेवरील तपासणी व उपचार |
| २१ सप्टेंबर | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| २१ सप्टेंबर | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २१ सप्टेंबर | डॉ. सचिन विलेकर, मुंबई (डायबेटीक तज्ज्ञ), | डायबेटीक फुट तपासणी व उपचार |
| २२ सप्टेंबर | डॉ. पुनित छाजेड (पिडियाट्रिक नेफ्रॉलॉजिस्ट), | मुंबई लहान मुलांच्या किडनी आजारावरील उपचार |
| २२ सप्टेंबर | डॉ. अमित साहू (रेडिऑलॉजीस्ट) | इंटरव्हेंशनल रेडिऑलॉजी तपासणी व उपचार |
| २२ सप्टेंबर | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| २९ सप्टेंबर | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |
| २९ सप्टेंबर | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |

- **डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.00 वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
- **आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
- **श्रवण यंत्र (बहिरेपणाचे मशिन) व वाचा उच्चार तज्ज्ञ (स्पीच थेरपिस्ट) दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी वालावलकर रुग्णालयात भेटतील**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०